# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १२३ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०३ आषाढ शके १९४८, बुधवार दि.२४ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### जीवनसाथीच्या शोधात फसवणूक? विवाह संकेत स्थळांवर वाढले सायबर गुन्हे

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

जीवनसाथीच्या शोधात फसवणूक होणे ही सध्या एक गंभीर समस्या बनली आहे.मॅट्रिमोनियल साइट्स आणि डेटिंग ॲप्सवर बनावट प्रोफाइलद्वारे कोट्यवधी रुपयांची सायबर फसवणूक करण्याचे प्रकार महाराष्ट्रात वेगाने वाढत आहेत.

जीवनसाथीच्या शोधासाठी वापरल्या जाणाऱ्या मॅट्रिमोनियल (विवाह) संकेतस्थळांवर सायबर गुन्हे आणि फसवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले. आहेत. फसवणूक करणारे बनावट प्रोफाईल बनवून भावनिक जाळ्यात ओढतात आणि नंतर महागड्या भेटवस्तू किंवा गुंतवणुकीच्या बहाण्याने लाखो रुपयांची फसवणूक करतात.बनावट प्रोफाईल तयार करून लोकांच्या भावनांशी खेळणे आणि पैशांची लूट करणे हा प्रकार सर्रास घडत आहे.

फसवणूक करणारे बनावट प्रोफाईल तयार करून भोळ्या-भाबड्या लोकांना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात आणि नंतर पैशांची मागणी करतात.

पुण्यातील पिंपरी चिंचवड येथे काही दिवसांपूर्वी अमरावतीच्या एका घटस्फोटीत महिलेची तब्बल २५ लाख ९० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रकार नुकताच समोर आला. गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पीडित महिलेने छाती डॉट कॉम या विवाह विषयक संकेतस्थळावर नाव नोंदणी केली होती सन २०१८ मध्ये आरोपीने स्वतःचे नाव अजय सिंग संतोष सिंग अग्रवाल आणि व्यवसाय बिल्डरशिप असल्याचे सांगून पीडीतेशी संपर्क साधला विश्वास संपादन करून त्याने कोर्ट मॅरेजचे आमिष दाखवले आणि पीडितेचे पॅनकार्ड व मॅरेज फॉर्म वर साक्षरी घेऊन तिला मोबाईलवर एका बनावट मॅरेज सर्टिफिकेटचा फोटो पाठवला व आपले दोघांचे लग्न झाल्याचे बनाव केला. लग्नाचा बनाव केल्यानंतर आपला तीन कोटींचा प्रोजेक्ट अडकल्याचे सांगत आरोपीने पैशाची मागणी केली तो स्वतः अमरावतीत आला आणि विहिरीतेकडून दोन लाख रुपये घेऊन गेला त्यानंतर वेगवेगळ्या कारणांसाठी त्याने एकूण २५ लाख ९० हजार रुपये उकडले. दरम्यान एका व्हिडिओ कॉल दरम्यान आरोपी सोबत दुसरी महिला दिसल्याने पिढीतील संशयाला तिने थेट मुंबई गाठून चौकशी केली असता आरोपी विवाहित असल्याचे आणि मॅरेज सर्टिफिकेट बनावट असल्याचे उघड झाले या प्रकरणी गाडगे नगर पोलिसांनी पुन्हा दाखल करून मनोज कुमार चंद्रप्रकाश त्रिवेदी सीतापुर उत्तर प्रदेश या , भामट्याला अटक केली.

काही दिवसांपूर्वी पुण्यातील पिंपरी चिंचवड मध्ये देखील अशीच घटना घडली. शादी डॉट कॉम वेबसाईटवरून मुलीशी संपर्क साधून लग्नाचं अमिष दाखवून महिलेची ३ करोड १६ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या तीन आरोपींना पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. रणजीत मुन्नालाल यादव, सिकंदर मुन्ना खान आणि बबलू रघुवीर यादव अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. फसवणूक झालेल्या महिलेकडून ८१ बँक खात्यावर पैसे घेतल्याचे पोलीस तपासात उघड झालं आहे.

फसवणूक करणारे भामटे

परदेशात (उदा. अमेरिका, कॅनडा) किंवा लष्करात चांगल्या नोकरीवर असल्याचे भासवून महागड्या भेटवस्तू व्हिसा फी किंवा वैद्यकीय इमर्जन्सीच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक केली जाते. सुरुवातीला जवळीक साधून वैयक्तिक माहिती काढली जाते आणि नंतर ती उघडकीस आणण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल केले जाते.बनावट मॅट्रिमोनिअल वेबसाईट किंवा कस्टमर केअर प्रतिनिधी बनून नोंदणी शुल्काच्या नावाखाली पैसे लुटले जातात.

हे धोके टाळण्यासाठी काळजी घेण्याची गरज आहे. अनोळखी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत पैशांची मदत करू नये किंवा बँक खात्याचा तपशील शेअर करू नये स्वतः पडताळणी करावी केवळ वेबसाईटवरील माहितीवर विश्वास न ठेवता, त्या व्यक्तीच्या कामाची जागा, कुटुंब आणि सोशल मीडिया प्रोफाईलची खात्री करून घ्यावी.जर समोरची व्यक्ती व्हिडिओ कॉल करण्यास टाळाटाळ करत असेल किंवा लगेच लग्न करण्याची घाई करत असेल, तर सावध व्हावे. नोंदणी करताना नेहमी सुरक्षित आणि अधिकृत सरकारी सायबर पोर्टल द्वारे प्रमाणित केलेल्या वधू-वर सूचक वेबसाईटचा वापर करावा.

# ॲग्रो फुड्समध्ये महाराष्ट्र देशात अव्वल, ब्रँडिंगची गरज

## जागतिक अर्थशास्त्र परिषदेत डॉक्टर विल धारूरकर

ज्योतिर्मय 📖 साहित्य

छत्रपती संभाजी नगर : ॲग्रो फूड क्षेत्रात महाराष्ट्र सध्या देशात अव्वल स्थितीत आहे परंतु भविष्यकाळात जागतिक बाजारपेठ काबीज करण्यासाठी महाराष्ट्रातील ॲग्रो फूड उत्पादकांना जनसंपर्क प्रतिमा निर्मिती आणि ब्रँडिंगचे शिक्षण देणे आवश्यक आहे असे मत प्रसिद्ध विचारवंत आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. विल धारूरकर यांनी व्यक्त केले. त्यांनी लिहिलेला द पब्लिक रिलेशन्स अँड ब्रॅण्डिंग ऑफ ॲग्रो फूड प्रॉडक्ट इन इंडिया ए स्टडी ऑफ महाराष्ट्र हा शोध निबंध जागतिक अर्थशास्त्र परिषदेसाठी स्वीकारण्यात आला होता. नुकताच जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांनी हा शोधनिबंध ऑनलाईन पद्धतीने सादर केला, याप्रसंगी जगातील फिनलँड युक्रेन तसेच अमेरिका इटली इत्यादी देशातील संशोधकाने सुद्धा आपले निबंध सादर केले. पोलंड या युरोपातील अग्रगण्य देशात वारसा विद्यापीठ येथे झालेल्या नव्या जागतिक अर्थशास्त्र परिषदेत डॉ. धारूरकर यांनी संशोधक शंतनू वाटाणे यांच्या समवेत हा शोध निबंध सादर केला. आपल्या भाषणात डॉ धारूरकर पुढे म्हणाले की महाराष्ट्रामध्ये २९ हजारापेक्षा अधिक ॲग्रोफुड कंपन्या कार्यरत आहेत, खाजगी तसेच सहकारी तत्त्वावर सुद्धा ॲग्रो फूड आघाडीवर आहेत. सहकारी दूध क्षेत्रात काम करणाऱ्या वारणा, अमूल, गोकुळ इत्यादी उत्पादनांची त्यांनी माहिती दिली तसेच महाराष्ट्रातील लिज्जत पापड कसा जगभर पोहोचला आहे हेही त्यांनी सांगितले. महिला बचत गटांच्या माध्यमातून महाराष्ट्रात तयार होणारी ॲग्रो फूड उत्पादने ही देशभर लोकप्रिय होत आहेत आणि मुंबईमध्ये त्यांची जेव्हा दरवर्षी सार्वजनिक विक्री होते तेव्हा ग्राहकांची झुंबड उडालेली असते. भारतामध्ये विविध राज्यात ६५००० फूड रेसिपी लोकप्रिय आहेत त्यापैकी अनेक पारंपरिक खाद्यपदार्थांचे रूपांतर आता प्रगत ॲग्रो फूड पॅकेजिंग मध्ये होत आहे हे स्पष्ट करताना त्यांनी रामबंधू या नागपूर स्थित कंपनीचे आणि आचार्य रामदेव यांच्या ६५ प्रमुख उत्पादनांचे सुद्धा महत्त्व सांगितले.




नवीन ॲग्रो फूड उत्पादक आता अगदी तालुक्याच्या पातळीवर कार्यरत असून त्यांनी आपापल्या भागात ग्राहकांची सेवा करून लोकांच्या दैनंदिन जीवनातील गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. दर्जा गुणवत्ता आणि बाह्यअवेस्टन तसेच पॅकेजिंग या क्षेत्रात आघाडीवर राहून ॲग्रो फूड कंपन्यांनी जागतिक स्पर्धेमध्ये टिकले पाहिजे असेही त्यांनी सांगितले. आता भारताने ३० पेक्षा अधिक देशाबरोबर मुक्त व्यापार करार केलेला असल्यामुळे ॲग्रो फूड उत्पादनास जगाच्या बाजारपेठेत खूप मोठी मागणी येत आहे हे लक्षात घेऊन अशा उत्पादनांचा दर्जा उंचविण्यासाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज आहे असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी विचारलेल्या काही प्रश्नांनाही त्यांनी समर्पक उत्तरे दिली. शंतनू वाटाणे यांनी समाज माध्यमांचा ॲग्रो फूड उत्पादनांच्या विपणन आणि प्रसारावर कसा परिणाम होतो हे सांगितले या शोधनिबंधाचा विस्तृत गोषवारा पोलंड विद्यापीठाच्या अर्थशास्त्र संशोधन पत्रिकेत प्रकाशित होणार आहे. डॉ धारूरकर यांच्या या अंतर्विद्याशाखीय संशोधनासाठी त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात अभिनंदन होत आहे.

# सूर्य पाहिलेला देश अर्थात जपान !

ज्योतिर्मय 📖 साहित्य

प्रखर राष्ट्रभक्ती आणि प्रगतीचा ध्यास यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर अल्पावधीत विकसित देशात गणला जाणारा जपान. इलेक्ट्रॉनिक्स आणि ऑटोमोबाईल क्षेत्रात जगाचं नेतृत्व करणारा आणि औद्योगिक क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबवणारा देश जपान .अशा जपान मधील एका प्रशिक्षण आणि अभ्यास दौऱ्यासाठी २०१३ साली भारतातून जाणाऱ्या ३० जणांमधे माझी निवड झाली होती . आमच्या ग्रुप मध्ये काही केंद्र शासनाचे आणि विविध राज्यांचे आय ए एस अधिकारी ,संचालक, उद्योग प्रतिनिधी आणि प्राचार्य होते.या अभ्यास दौऱ्याचे नियोजन भारत व जपान च्या लघुउद्योग मंत्रालय यांनी संयुक्तपणे केले होते आणि खर्च जपान ची औद्योगिक संगठना करणार होते.

राज्य सरकारी अधिकाऱ्याना राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्या विहित परवानगी शिवाय परदेश प्रवास करता येत नाही त्यामुळे असे परवानगी पत्र प्राप्त झाल्याखेरीज निवड झाली तरी प्रत्यक्ष प्रवास सुरु होऊ शकत नव्हता. विहित नमुन्यात आवश्यक माहिती शासनाच्या परवानगी साठी सादर करण्यात आली होती पण प्रत्यक्ष प्रवासाचा दिवस आला , विमान तिकिटही आले तरीही परवानगी पत्र हाती आले नव्हते त्यामूळे दौरा रद्द असे गृहीत धरुन मुंबई हून पुण्याला परत निघालो. परतीच्या वाटेवर असतानाच अचानक निरोप मिळाला की शासनाने या दौऱ्याला मंजुरी दिली आहे आणि आम्हाला जायचं आहे . च्या वतीने सुधारित तिकिट आम्हाला पाठवण्यात आले आणि आमचा दिल्ली – टोकियो जपान प्रवास सुरु झाला. टोकियोहून ट्रेन ने योकोहामा येथे पोहचलो. तेथील योकोहामा केंशू सेंटर येथे आमची व्यवस्था केलेली होती. आमच्यातील कुणालाच जपानी भाषा अवगत नव्हती त्यामुळे पहिल्या दिवसापासून दुभाषीची आणि ट्रान्समीटरची सोय करण्यात आली होती.

व्याख्यानासाठी येणारे वक्ते त्यांच्या राष्ट्रीय म्हणजे जपानी भाषेतच संवाद साधत होते . जपानची शिक्षण



प्रणाली, उद्योग आणि शैक्षणिक संस्था समन्वय, कैझन, फाईव्ह एस तत्वे, मोनोझुकुरी, जस्ट इन टाईम, झीरो डिफ ेक्ट, अशा विविध संकल्पना आणि विषयांवर तज्ञांची व्याख्याने आणि चर्चासत्र झाले त्यामूळे जपानने अल्पावधीत केलेल्या प्रगतीचे वेगळेपण समजले. यासोबतच काही ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन अभ्यास करण्याची देखील संधी मिळाली. यामध्ये प्रामुख्याने तेथील प्राथमिक शाळा, टोकियो टेक्निकल कॉलेज, टोयोटा कंपनीचे ट्रेनिंग सेंटर, जगप्रसिद्ध टोयोटा कंपनीचा नागोया येथील फॅक्टरी प्लांट व टोकियो येथील मुख्यालय, ओव्हल कॉर्पोरेशन कंपनी प्लांट, या सर्व भेटीत जपानने स्वतः




विकसित केलेल्या कायझन, फाईव्ह एस, झीरो डिफेक्ट, जस्ट इन टाईम या विविध संकल्पना आणि त्यांची प्रत्यक्षात यशस्वी अंमलबावणी करून त्याद्वारे अल्पावधीत कशी प्रगती साध्य केली हे प्रकर्षाने जाणवले. तेथील प्राथमिक शाळेत प्रत्येक विद्यार्थ्यासाठी शूज, टिफीन, बॅग,ठेवण्याच्या जागा फाईव्ह एस प्रमाणे निश्चित करण्यात आल्या होत्या आणि त्याच ठिकाणी त्या वस्तू ठेवलेल्या होत्या.

शाळेतील मुले मुली आपले वर्ग,ग्रंथालय स्वतः स्वच्छ करताना दिसत होते अशा प्रकारे पाच गृहपालन तत्त्वांचे सिरी(वर्गीकरण), सेटॉन(अनुक्रमे मांडणी), सिसो ( स्वच्छता), सेकेत्सु(प्रमाणीकरण) आणि शित्सूकें(शिस्त आणि अनुपालन)या पाच जपानी गृहपालन तत्त्वांचे अनुपालन प्राथमिक स्तरावरच करण्यात येत होते जेणेकरुन लहानपणा पासूनच विद्यार्थ्यांना स्वच्छता आणि स्वावलंबन याची सवय लागेल ते त्यांच्यामध्ये रुजेल अशी ही पद्धत होती. तेथील तांत्रिक प्रशिक्षण संस्था या प्रोजेक्ट बेस्ड लर्निंगचा अधिक अवलंब करताना दिसून आल्या. परिणामकारक प्रशिक्षणासाठी जॉबशीट आणि क्लासशीटचा वापर हे त्यांचे वेगळेपणं जाणवले. प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग मुळे विद्यार्थी नाविन्यपूर्ण आणि निर्मितीक्षम विचार करतात तसेच अधिक कौशल्य आत्मसात करतात असे दिसून आले. जपानच्या अतिशय वेगवान अशा बुलेट ट्रेनमध्ये बसून प्रवासाचा अनुभव हा अविस्मरणीयच होता. टोकियो शहर तसे गर्दीचे आणि धावपळीचे वाटले.येथील रॉयल पॅलेस बाहेरून बघता आला.

कोणतीही नवीन संकल्पना ही राष्ट्रहित समोर ठेऊन तसेच राष्ट्रीय कर्तव्याच्या भावनेने जपानी माणूस यशस्वी पणे आत्मसात करतो आणि त्याचे पालन करतो ही बाब खरोखरच आदर्श आणि अनुकरणीय आहे . आमची जपान टूर अतिशय प्रेरणा दायक झाली म्हणूनच जपानला म्हणावे वाटते अरीगातो गोझाईमास अर्थात थँक्यू व्हेरीमच जपान !

***







## जात्यावरच्या ओव्या......

अरे पड ना पाण्या
तुला आण भुकेल्याची
धांडे वाळले चावती
जोडी खिल्लारी बैलाची ||७०७||

अरे पड ना पाण्या
गेले आटून पानवठे
रानावनातले जीव
तहानले भटकते ||७०८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ४२




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

**बहुतांपरी हेचि आता धरावे ।**
**रघुनायका आपुलेसे करावे।**
**दीनानाथ हे तोडरी ब्रीद गाजे।**
**मना सज्जना राघवी वस्ती कीजे।४२।**

अर्थ : हे मना, तुला वेगवेगळ्या प्रकारे सांगून झाले. आता ही एकच गोष्ट लक्षात ठेव की रघुनायकाला म्हणजे रामाला तू आपलेसे कर. तो अनाथांचा नाथ आहे असा त्याचा लौकिक सर्वत्र गाजतो आहे. तेव्हा तू मनाने भगवंतपाशीच कायमचा निवास कर.

( बहुतांपरी - वेगवेगळ्या प्रकारे, धरावे - लक्षात ठेव, तोडर - पायातील किंवा हातातील एक अलंकार/तोडा/तोरड्या )



विवेचन : सगळ्या गोष्टींचा ( आपल्या कर्तव्याचा किंवा स्वधर्माचा नव्हे ) म्हणजे माया, मोह इत्यादींचा त्याग करून भगवंताला शरण जावे हे वेगवेगळ्या प्रकारे सांगून झाले असे समर्थ आपल्याला सांगतात. इथे बहुतांपरी या शब्दाचे दोन अर्थ घेता येतात. पहिला अर्थ म्हणजे नाना परीने, निरनिराळ्या प्रकारे. जी लहान मुले ऐकत नाहीत त्यांना आपण निरनिराळ्या प्रकारे समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो तसेच समर्थ देखील आपल्याला हे वेगवेगळ्या शब्दात समजावून सांगतात. चांगल्या गोष्टी या परोपरीने पुन्हा पुन्हा सांगून मनावर ठसवाव्या लागतात. तसेच समर्थ या ठिकाणी करतात परंतु अशा गोष्टींनाही एक मर्यादा असते. म्हणून ते निर्वाणीचे सांगतात की आता तू रघुनायकाला म्हणजे भगवंताला आपलेसे कर.

बहुतांपरी या शब्दाचा दुसराही अर्थ असा घेता येतो की परमेश्वराचे जे अनेक भक्त झाले, त्यांच्याप्रमाणे तू वाग आणि परमेश्वराला आपलेसे करून घे. रामायणातील कैकयी, रावण यासारखी काही मोजकी पात्रे वगळली तर बहुतेक इतरांनी श्रीरामांना भक्तीने आपलेसे करून घेतले आहे. हनुमान, बिभीषण, शबरी, गुहक असे अनेक जण त्यांचे भक्त होते. सुदामा, कुंती, द्रौपदी, पांडव, विदुर यासारखी अनेक मंडळी श्रीकृष्णाची भक्त होती. त्यांनी श्रीकृष्णाला आपलेसे करून घेतले होते. श्रीकृष्ण त्यांना आपला सखा, मित्र, बंधू, मार्गदर्शक, तारणहार असे सगळे काही वाटत होता. **(क्रमशः)**




## || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ भक्ती

भक्ती ही आपला देवावर असलेला विश्वास आहे, आपण श्रद्धेने भक्ती करतो व त्यामधून आपल्याला संकटाशी लढण्याची प्रेरणा मिळते म्हणून प्रत्येकाने देवावर विश्वास ठेवून त्याची भक्ती करावी.

## भगवंत हाच एकमेव आधार वाटला पाहिजे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

एक भगवंत सत्य आहे. आपले कुठे चुकत असेल तर ते हेच की, आम्ही प्रपंच सत्य मानतो. फणस कापायला ज्याप्रमाणे हाताला तेल लावावे लागते त्याप्रमाणे, राजकारण घ्या, किंवा प्रपंच घ्या, हरिप्रेमाचे तेल आधी हाताला लावावे. समर्थांनी ‘ मुख्य हरिकथानिरूपण ’ असे सांगितले; म्हणजे बाकीच्या गोष्टी आपोआप मागे येतील. आम्ही कर्तेपण मिरवू पाहतो इथेच सर्व बिघडते. हरीचे अधिष्ठान ठेवण्याआधी आम्ही आपल्या कर्तेपणाचेच अधिष्ठान ठेवतो. लग्नाच्या आधी देवाला नमस्कार करतो, पण पुढे प्रपंचात देवाला विसरतो, हे चुकते. नुसते विषय घातुक नाहीत; त्यांच्यात आम्ही आपल्या आवडीने जीव घालतो हे घातक आहे, विषयाच्या ताब्यात जाणे घातुक आहे. इमारत मोठी करावी, कळस सुंदर, सोन्याचा करावा म्हटले, पण पायाच जर चांगला नाही घातला तर देऊळ कसे टिकावे ?

अमुक एका कार्याला कुणाची मदत नको म्हटले, तर आपण जे म्हणू ते व्हायला पाहिजे. ते होत नाही. तेव्हा मदत कोणाची तरी घ्यायचीच, तर मग आपल्यासारख्या बुडत्याचीच घेऊन काय उपयोग ? भगवंताचीच घेतली पाहिजे. आम्ही जर भगवंताजवळ विषय मागितले तर त्याचे फळही घ्यावे लागेल. दुर्योधन आणि अर्जुन भगवंताची मदत मागायला आले. एवढे सैन्य सोडले आणि अर्जुनाने भगवंताला मागितले. दुर्योधनाने जे मागितले तेच नाही का आम्ही आज प्रपंचात मागत ? आमचे कार्याकडे लक्षच नसते, सर्व लौकिकाकडेच असते. ‘ मी दुसऱ्या कशाचाही नाही ’ असे म्हटले म्हणजे भगवंताला अनन्य शरण होता येते. ‘परमात्मा हवा’ ही नाही आम्ही जाणीव करून घेत, ‘जग हवे’ असे म्हणतो; आणि तिकडे, सर्व जग मला नावे ठेवते असेही म्हणतो ! मी म्हणतो, जगाला नावे ठेवू द्या, पण राम काय म्हणतो इकडे पाहणे जरूर आहे. आपण परमेश्वराचे परमेश्वरालाच दिले तर कुठे बिघडले ? जो दिसत नाही, भासत नाही, त्याचे हे सर्व आहे असे म्हणण्यात कुठे बिघडते ? ते म्हणण्यात जे समाधान मिळते ते नाही आम्हाला समजत. खरोखर परमात्मा साक्षात् कल्पवृक्ष आहे. आपण नेहमी चिंता वाहतो, म्हणून तो आपल्याला चिंताच देतो. आपण जर त्याच्याकडे आनंद मागितला तर तो आपल्याला आनंदच देईल. भगवंताचा आनंद हा फार बलवत्तर आहे. तो एकदा मिळाल्यावर प्रपंचातल्या लाभहानीचे महत्त्व नाही.राम हा त्रैलोक्याचा स्वामी आहे, आपण त्याचे सेवक आहोत. पण आम्ही नोकरी दुसऱ्याची करतो आणि पगार मात्र रामाजवळ मागतो ! तसे करू नये, खरे-खुरेच रामाचे दास व्हावे. ज्ञान, योग, प्राणायाम वगैरे भगवंतावाचून येऊ शकेल, पण भक्ती मात्र भगवंतावाचून येणार नाही. भक्ती ही भगवंताची देणगी आहे. प्रपंच करणे हा आपण स्वार्थ म्हणतो. पण तो खरा स्वार्थ नाही; खरा स्वार्थ भगवंताचे होण्यात आहे.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

. मंदिरातील प्रार्थना

मंदिरात भगवंताच्या दर्शनाला गेलो की, भगवंता पाशी काय मागावे? याची एक सुंदर प्रार्थना प्राप्त झाली आहे.

अनायासेन मरणं/ विना दैन्येन्
जीवनम् देहांते तव सानिध्यम देही
मे परमेश्वर//

मंदिरात आपण देव दर्शनाला जातो. आपण प्रभु भक्तीच्या ओढीने मंदिरात जावे. आपण मंदिरात जातो ती मागण्यांची यादी घेऊनच, आपली ही यादी कधीच संपत नाही. म्हणजे मंदिरात दर्शनाचा भाव हा कमी आणि मागणीची प्रस्तुती मात्र जास्त, अशीच आपली अवस्था होऊन जाते. खरे तर मंदिरात जावे, ते केवळ प्रभू दर्शनासाठी. प्रभू दर्शनाची लालसा मनात नित्य असावी. कधी एकदा त्यास पाहतो हा उतावीळ भाव सदैव मनी जागृत व्हावा. केवळ प्रभूच्या दर्शनाने मनाची तृप्ती व्हावी, व पुन्हा प्रभू दर्शनाची आस लागावी, इतकी उच्च अवस्था आपणास यावी. हे खरे असले तरी प्रपंचात अडकलेले आपण सारे, काही ना काही मागण्याच्या इच्छेने मंदिरात जातो. म्हणून निदान वरील दिलेली मागणी मंत्र रूपात आपण मागावे.

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "माणसाचे वर्तन हेच जीवन"

*सुख व दुःख हे आपल्या मनातील वागण्यावर आहे, म्हणून सुख का येते, कसे येते, आपण दुःखी का होतो? त्यासाठी तयारी करतो? हे महत्त्वाचे नाही का? आनंद सुख हवे असेल तर स्वतःमधे बदल घडवावा लागेल! तुमचे मन शक्तीशाली बनवावे लागेल, कमकुवत, आत्मविश्वास नसलेले मन घेऊन तुम्ही कधीच मजबूत होऊ शकत नाही. छोट्या छोट्या सवयी सुध्दा आपल्या मनाची शक्ती कमी करतात. पुढे याच सवय एका आजाराचे रूप घेतात, त्या जीवनभरचे ओझे दुःख बनतात म्हणून आपल्याला माणूस, स्त्री, तरूण मुलेमुली सर्वांनी अंहकार व रागावर काम करावे लागेल !विनम्रता म्हणजे डोके खाली, पुजा अर्चा भक्ती, योगसाधना खाणेपिणे, आहार आणि झोप यावर नियंत्रण ठेवावे लागेल, असे मला सांगावे वाटते. धन-पैसा-अंहकारातून निराशाही येते. आपल्या मधील राम एकीकडे-शरीर दुसरीकडे दानधर्म करून ऊपयोग होईल का? शरीराचा, मनाचा, संसाराचा ज्याला नीट आनंद घ्यायचा आहे, त्याने अविचाराने काहीही करू नये! मारामारी खूण अत्याचार बलात्कार चोरी कशामुळे? यावर आपली उपाययोजना काय? यावर विचार कोणीच करत नाही. पुर्वी सामाजिक नियम, माप- दंड-मानदंड, नीतीअनिती हे बघत. पण आज स्वैराचार व चंगलवादीपणा वाढल्याने दुःखाला जागा मिळते! म्हणून आतल्या रामाला विचारावे.. जे हनुमानाने केले म्हणजे सुखी होण्यासाठी रामचरणी लीन झाला व खरा रामभक्त बनला. म्हणून शेवटी हेच खरे की, माणसाचे वर्तन व मन हेच जीवनाला आकार देते. ईथेच थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग वाचत राहा. गुड डे व्हेरी गूड़ मार्निग.*




## नाचणीचे आंबील म्हणजे शरीराला थंडावा देणारे अमृतच आहे.....

ज्योतिर्मय साहित्य

हे केवळ तहान शमवत नाही, तर उन्हामुळे होणारा दाह कमी करण्यासाठी अत्यंत गुणकारी मानले जाते.

तुम्हाला पारंपरिक पद्धतीने आंबील बनवायची असेल, तर खालील सोपी पद्धत वापरून पाहू शकता:

साहित्य...

- ✻ नाचणीचे पीठ: १ वाटी,
- ✻ ताक: २ वाट्या (थोडे आंबट असल्यास उत्तम),
- ✻ पाणी: ३ ते ४ वाट्या,
- ✻ जिरे पूड: १ चमचा,
- ✻ लसूण पाकळ्या: ४-५ (ठेचून),
- ✻ मीठ: चवीनुसार,
- ✻ बारीक चिरलेली कोथिंबीर.

कृती...

पीठ भिजवणे: एका भांड्यात नाचणीचे पीठ आणि थोडे पाणी एकत्र करून गुठळ्या होणार नाहीत अशा प्रकारे कालवून घ्या. शक्य असल्यास हे मिश्रण ३-४ तास किंवा रात्रभर आंबायला ठेवावे, यामुळे आंबील जास्त चविष्ट आणि पचायला हलकी होते.

पाणी उकळणे: एका मोठ्या पातेल्यात उरलेले पाणी उकळायला ठेवा. त्यात थोडे मीठ आणि ठेचलेला लसूण टाका.

पीठ शिजवणे: पाणी उकळू लागले की त्यात नाचणीच्या पीठाचे मिश्रण हळूहळू सोडा आणि सतत ढवळत राहा जेणेकरून गुठळ्या होणार नाहीत. मिश्रण घट्ट होईपर्यंत चांगले शिजवून घ्या.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

थंड करणे: पीठ शिजल्यानंतर गॅस बंद करा आणि हे मिश्रण पूर्णपणे थंड होऊ द्या.

ताक मिसळणे: मिश्रण थंड झाल्यावर त्यात ताक, जिरे पूड आणि कोथिंबीर घालून व्यवस्थित मिक्स करा.

उन्हाळ्यात आंबील पिण्याचे फायदे...

नैसर्गिक थंडावा: नाचणी निसर्गातः थंड असते, त्यामुळे शरीराचे तापमान नियंत्रित राहते.

हायड्रेशन: ताक आणि पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते.

पचनास सुलभ: ताकातील प्रोबायोटिक्समुळे पचनसंस्था सुधारते.

उर्जा वाढवते: उन्हाळ्यातील थकवा दूर करून त्वरित उर्जा मिळवण्यासाठी हे उत्तम पेय आहे.

तुम्ही हे आंबील सकाळी नाश्त्याला किंवा दुपारच्या जेवणाआधी घेऊ शकता.

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### अधिकार

आईचा अधिकार असे
खरा या जीवनावर
जन्म मला दिला
प्रथम ती गुरु
आहे या जीवनाचा
मान तिचाच पहिला


अधिकाराप्रती बोले पिता
ओठावरी बोल कडू
अंतरी भरपूर माया
लेकरांसाठी झिजताना सदा
सर्वांवरी धरत असतो
सुख,समाधानाची छाया

# सर्व धर्म समभाव

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आपला भारत देश म्हणजे उच्च कोटीची संस्कृती व संस्कृतीचा वारसा लाभलेला देश आहे. आपल्या भारत देशात एकमेकांचा, जाती-धर्माचा, भाषेचा, वेशभूषेचा, खान-पान पद्धतीचा, त्या-त्या संस्कृतीचा आदर केला जातो व मान दिला जातो. सर्व धर्म समभाव म्हणजे सर्व धर्मांना समान मान, समान न्याय आहे. म्हणजे सर्व धर्मांना समान मान, सन्मान न्याय व आदर दिला पाहिजे. या गोष्टी आपल्याला आपल्या भारत देशाची संस्कृती व कायदा शिकवितो. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या धर्माचा अभिमान आहे तो बाळगावा मात्र इतर धर्माचाही आदर करावा, कोणत्याही धर्माची उचनीचता मानू नये.

कदाचित यामुळेच एकमेकांच्या आत असलेली माणुसकी व देशाची लोकशाही टिकून राहण्यास सहाय्य ठरते. सर्व धर्म समभाव या संकल्पनेचे श्रेय ''परमपूज्य महात्मा गांधीं यांना'' जाते. महात्मा गांधीजींनी विविध जाती आणि विविध समुदायातील लोकांना एका मोठ्या वसाहत विरोधी चळवळीत एकत्र आणण्याच्या उद्देशाने सर्व धर्म समभावाची संकल्पना जन्माला घातली. आणि म्हणूनच या संकल्पनेचा आदर करत आपला भारत देश आजतागायत आत्तापर्यंत एकतेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. धर्मनिरपेक्ष समाजाची निर्मिती करावयाची असेल तर, सर्व धर्म समभाव या संकल्पनेचे विस्तारित रूप अभ्यासणे गरजेचे आहे.



सर्व धर्म समभाव ही संकल्पना भारताच्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतिनिधित्व करते. गांधीजी म्हणतात की, धर्म हा एक असा स्रोत आहे जो राष्ट्राला विभाजित करण्याऐवजी एकत्र आणतो. म्हणून सर्व संकल्पना धर्म समभावाची एकतेवर व समानतेवर आधारित आहे. कोणत्याही व्यक्तीने कुठलाही धर्म श्रेष्ठ न मानता सर्व धर्माचा आदर करावा. व माणुसकीचे उत्तम उदाहरण द्यावे. आपल्या प्रत्येकाला प्रत्येक गोष्टींचे ज्ञान प्रत्येक धर्मग्रंथात आढळते. प्रत्येक धर्मग्रंथात चांगल्या व शिकण्या योग्य गोष्टी लिहून ठेवल्या आहेत. सर्व धर्म समभाव ही संकल्पना प्रत्येक धर्मग्रंथात आणि सामाजिक विचारसरणीमध्ये आढळते.

आपण प्रत्येक जण आपल्या धर्माचा आदर करतो ते पालन करण्याचे स्वातंत्र्य आपल्याला कायद्याने दिले आहे. मात्र, आपण आपल्या धर्माचे पालन व आदर करीत असताना इतर कुठल्याही धर्माच्या भावना व मन दुखावले जाणार नाही अशा पद्धतीने आपला धर्म पाळावा. एकच धर्म माणुसकीचा धर्म. हे लक्षात ठेवून आधी एकमेकांची मदत व सहकार्य आणि मग धर्माच्या गोष्टींचे पालन हे सूत्र प्रत्येकाने पाळावे. हाच खरा धर्म. आपल्या भारत देशात प्रत्येक राज्य, प्रत्येक प्रांत प्रत्येक व्यक्ती एकमेकांचा आदर करीत एकमेकांचे संरक्षण करीत आहेत.

आणि यामुळेच आपल्या भारत देशाचा एक वेगळाच लौकिक आहे. हे चित्र उभ्या जगाने पाहिले आहे. सर्व धर्म समभाव ही एक अति व्यापक व विस्तारित एकमेकांमधील व धर्मा धर्मातील समानता दर्शविणारी संकल्पना आहे. आणि ही संकल्पनाच एकमेकांना एकमेकांच्या धर्माचे पालन व आदर करण्यास शिकविते. प्रत्येक धर्म अहिंसेचा मार्ग दाखवितो. प्रत्येक धर्म मैत्री पूर्ण नात्याने वागतो व तसे वागण्यास शिकविते. प्रत्येक धर्मातील तत्त्वज्ञान शिकविण्याचे काम सर्व धर्म समभावातील संकल्पनेतच आढळते. सर्व धर्म समभाव या व्यापक संकल्पने नुसार प्रत्येक व सर्व धर्मामध्ये समान मूल्ये, तत्व, नियम, अटी आहेत.


सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. जि. नांदेड
मो. 9960028899

आणि या सर्व गोष्टी एका कायद्याच्या चौकटीत राहून वर्तन करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकास प्रेम, स्नेह, सस्नेह, करुणा, अहिंसा, मतभेद विरहित समाजाची स्थापना, नैतिकता आणि नीतिमत्ता या सर्व गोष्टींचे आकलन व ज्ञान देण्यास मदत करते. व सामाजिक न्यायाची प्रक्रिया स्पष्ट करते. सर्वधर्मसमभाव ही व्यापक संकल्पना आपल्या भारतीय संस्कृतीचा व साफल्य विचारसरणीचा एक अविभाज्य अंग वा घटक आहेत. आणि ही विचारसरणी आपण ज्या समाजात राहतो त्या समाजात एकता, एकतेची भावना, समानता, समानतेची भावना, बंधुत्व, मैत्रि, न्याय, सामाजिक बांधिलकी, आदर, सहकार्य, आदराची भावना, शांतता व एकमेकांबद्दल समभाव निर्माण करण्यास साहाय्य करीत असते. प्रेम करूणा



# बिना प्रशिक्षित समुपदेशक !

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आजच्या धावपळीच्या जगात तणावपूर्ण वातावरणात अगदी आबालवृद्ध नैराश्याच्या छायेत, तणावात मानसिक अस्थिरतेत जगताना दिसतात. म्हणजे अगदी सांगायचे झाले तर किमान दहा व्यक्ती मागे एक व्यक्ती डिप्रेशनचा शिकार असेलच या गंभीर समस्येवर उपाय देणारे क्षेत्र म्हणजे समुपदेशनाचे. आजच्या घडीला सर्वात चांगला चाललेला व्यवसाय म्हणजे समुपदेशकांचा आहे.

निराशेत गेलेल्या व्यक्तीला धीर देणे, आधार देणे, त्यांची समस्या मनापासून ऐकणे, त्यावर मार्गदर्शन करणे, उपाय सांगणे या गोष्टी समुपदेशक करत असतो. समुपदेशकांची वाढती गरज हेच दर्शवते की समाजात निराशा वाढत चालली आहे. पूर्वी प्रश्न नव्हते का...? निराशा नव्हती का...? प्रमाण कमी असेल पण नक्कीच होते.


अर्चना हिंग्लजकर, शिरवळ,
9225527464


कोणतेही विशिष्ट प्रशिक्षण घेणारे आपले आई-वडील, आजी आजोबा, गावातील वृद्ध व्यक्ती समुपदेशनाचे काम अगदी बिनचोख करायचे, अगदी आपल्याही नकळत. मग त्यासाठी ते कधी कधी स्वतःच्या अनुभवांची मदत घ्यायचे कधी कधी दुसऱ्यांच्या अनुभवांचा. समोरच्याचे ऐकून घेणे, त्यांच्या भावनांचा आदर करणे, त्याच्याही नकळत त्याच्या प्रश्नांचे समाधान मिळवून देणे हे काम अगदी सहज करायचे. असे विना प्रशिक्षित समुपदेशक घरोघरी, गावोगावी असायचे. त्यामुळे प्रशिक्षित समुपदेशकांची गरज पडायची नाही. वृद्ध लोक म्हणजे अनुभवाचे विद्यापीठ जणू .प्रत्येक प्रश्नावर त्यांच्याकडे उत्तरे असायची. भलेही ती डॉक्टरी भाषा नसेल. डॉक्टरी अभ्यास नसेल पण गावठी भाषेत उत्तम समजावण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. गरज पडली तर कान पिळण्याची धमकही होती. हे समुपदेशन रोजच्या रोज व्हायची. सायंकाळी पाराखाली जमणारी गर्दी, दिवसभराच्या गप्पा, एकमेकांची सुखदुःख वाटून घेतली जायची. एकमेकांची मन जाणली जायची, गरजू व्यक्तीला उपाय सहज मिळूनही जायचा. म्हणून पूर्वी पारावर निराशा नाही तर खळखळ हसण्याचा आवाज यायचा आणि हसरे चेहरे दिसायचे रोजच्या रोज समुपदेशन होत असेल तर विशेष समुपदेशनाची गरज नाही भासायची. हेच ते बिना डिग्री वाले समुपदेशक कित्येक पिढ्यांना समुपदेशन करायचे.

# योगाभ्यास ही पहिली पायरी आत्मसाधना हा मूळ उद्देश


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

योगाभ्यास सर्वांनाच करावा वाटतो. परंतु तो आज नको उद्यापासून करू अशी एक मानसिकता आज मोठ्या प्रमाणात दिसून येते. आज सर्वांनाच योगाभ्यास प्रत्यक्ष जीवनात सक्रिय करण्याची आवश्यकता आहे. ''योगा'' बद्दल सर्वजण सगळीकडे वाचतात, ऐकतात कोणीही अनभिज्ञ नाही. तथापि आपण मांडलेला विषय, विचार उपयुक्त आहे.

योगाभ्यास आज आणि आजच झाला पाहिजे, उद्यापासून नको हे बरोबर आहे. उद्या कधीच येत नसतो, आज हे सत्य असते. भविष्य कधीच अस्तित्वात नसते. तो क्षण वर्तमान म्हणून अस्तित्वात येत असतो. काळ हा कोणासाठीही थांबत नाही. काळ निरंतर गतिशील असतो. काळाचा परिणाम म्हणूनच जीव अजीव सर्वांच्या अवस्थेमध्ये परिवर्तन होत असते. मन प्रसन्न, समभावात राहण्यासाठी आणि शरीर स्वस्थ राहण्यासाठी, उत्साह आणि ऊर्जा वाढण्यासाठी योगाभ्यास हा दररोज केला पाहिजे. दररोजच्या दिनचर्या मध्ये पहाटे किंवा सकाळच्या पहिल्या वेळेमध्ये आवश्यक म्हणून काही वेळ यासाठी राखून ठेवावा, अवश्य द्यावा. साधनेसाठी पहाटेचा वेळ हा उत्कृष्ट यासाठीच की त्यावेळी साधना पूर्णत्वाला जावी असे पवित्र स्त्राव हे अनेक ग्रंथी मधून स्त्रवत असतात. आपल्या योग साधनेला त्याची मदत होते. कोणत्या ग्रंथी मधून कोणत्या समयाला कोणते स्त्राव स्त्रवतात याचे विस्तृत विश्लेषण करण्याचा या ठिकाणी विचार नाही.



वास्तविक पाहता शरीरासाठी केलेला योगाभ्यास त्यासाठी आसन प्राणायाम या क्रिया अस्तित्वात आहेत. मन आणि चैतन्याच्या उज्वलतेसाठी योगाच्या पुढील पायरी ''ध्यान'' ही अस्तित्वात आहे. योगाच्या आधारे शरीर स्वस्थ आणि मन स्थिर करायचे असते. ही स्थिरता साधली म्हणजे त्यातूनच मनाची एकाग्रता साधली जाते. मनाच्या चंचल वृत्तीला लगाम घालणे हा योगाचा उद्देश आहे.


© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108

आत्मिक उज्वलतेसाठी साधना करत असताना योगा ही पहिली पायरी. शरीर आणि मनाची स्वस्थता हे त्यातून मिळवलेले उत्पाद. मूळ उद्देश हा आत्मसाधना आहे. या साधनेच्या प्रक्रिया प्रवृत्ती मध्ये योगा म्हणजे योगाभ्यास हे नितांत आवश्यक आहे. परंतु आज आत्मसाधनेचा उद्देश सोडून शारीरिक स्वस्थतेसाठी, शरीर अधिक काळ व्यवस्थित टिकवण्यासाठी व्यायाम यादृष्टीने योगा कडे पाहिले जाते. आत्मसाधने साठी केल्या जाणाऱ्या ध्यानाची,साधनेची आसन ही पहिली पायरी. त्यानंतर मनाची चंचलता दूर करण्यासाठी प्राणायाम. आणि त्यातून एकाग्रता साधल्यानंतर ध्यानाची एक एक पायरी आत्मसात करायची असते. म्हणूनच आत्मिक उज्वलता या परम पावन पवित्र साध्यासाठी योगाभ्यास आणि ध्यान ही साधना असते. यात आपण स्वतः साधक. मग साधक कसा असावा यासाठी काही नियम असतात. ते समग्रपणे या ठिकाणी विश्लेषण करण्याचा विचार नाही. सात्विक आहार आणि विहार, आणि सर्व विषयात समभाव ही जीवनशैली इतकेच या ठिकाणी म्हणता येईल.

साधना उत्कृष्ट होण्यासाठी परम पावन आणि पवित्र मानसिकतेतून अभ्यास असेल तर उत्तम साधक हा साध्या ची पवित्र स्वरूपात प्राप्ती करू शकतो हेच उत्तम सत्य. आत्मसमृद्धी हेच साधनेचे प्रमुख ध्येय आहे. आणि हाच मुक्ती मार्ग. प्रत्येक क्षण हा आपण मुक्तीसाठीच जगत असतो हे कदापि विसरता कामा नये.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

कालच्या अंकावरून पुढे...
महाभारतातल्या कर्णाचं उदाहरण आपल्याला सगळ्यांना माहिती आहे. खरं तर तो ज्येष्ठ कुंतीपुत्र आणि अत्यंत तेजस्वी असा सूर्यपुत्र. राज्यावर पहिला हक्क त्याचा. पण जन्म होतो आणि त्याचा त्याग त्याच्या आईलाच करावा लागतो. तरीही, आपल्या पराक्रमाने आणि कर्तृत्वाने आपल्याला मिळालेल्या या जाड्याभरड्या वस्त्राचं रूपांतर तो महावस्त्रात करतो. तो अभिमानाने सांगतो:

सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम्।
दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्॥

( मी विणकर वा विणकर पुत्र जे काही असेल ते दैवामुळे आहे. कोणत्या कुळात जन्म घ्यायचा हे माझ्या हातात नाही, पण माझ्या कर्तृत्वाने आणि पराक्रमाने मोठे व्हायचे की नाही ही गोष्ट नक्कीच माझ्या हातात आहे.)

याउलट रावणाचं उदाहरण जर आपण पाहिलं तर असं दिसतं की रावण ऐश्वर्यसंपन्न होता, शक्तिमान होता, विद्वान होता, शंकराचा परमभक्त होता, लंकेसारख्या सुवर्णनगरीचा राजा झाला होता. एका अर्थाने त्याच्या पदरात पडलेले हे महावस्त्रच होते. पण आपल्या नैतिक अध:पतनाने आणि अहंकारामुळे त्याने या वस्त्राचे पार पोतेरे केले.

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे असं आपण म्हणतो, पण माणसाला 'माणूस' म्हणून जगण्याचं बळ देणारी खरी शक्ती नात्यांमध्ये असते. जन्माला आल्यापासून ते आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत आपण अनेक नात्यांच्या धाग्यांनी वेढलेले असतो. काही नाती रक्ताची असतात, तर काही नाती प्रेमाची, विश्वासाची आणि कर्तव्याची असतात. ही नात्यांची वीण जेवढी घट्ट, तेवढं कुटुंब निकोप; आणि कुटुंब जेवढं निकोप, तेवढा समाज आणि देश सुदृढ. नाती ही केवळ आपणा सर्वांना एकमेकांशी जोडणारी साखळी नसून, ती संपूर्ण समाजाला अंतर्गत ऊर्जा देणारी एक जिवंत व्यवस्था आहे. म्हणूनच, मिळालेली नाती जपायला हवीत, वाढवायला हवीत.

क्रमश:.......

## ज्ञान, मूल्ये आणि शिक्षण व्यवस्थेची वास्तविकता

ॲड. प्रा. कौशिक म. हरणे मो. ९६७३१७५१९७



एखाद्या राष्ट्राची खरी ताकद त्याच्या नैसर्गिक संपत्तीमध्ये, भौतिक प्रगतीमध्ये किंवा आर्थिक सामर्थ्यामध्ये नसते; ती त्या राष्ट्रातील सुशिक्षित, सुसंस्कृत, चारित्र्यसंपन्न आणि मूल्यनिष्ठ नागरिकांमध्ये असते. अशा नागरिकांची निर्मिती ही कोणत्याही शिक्षण व्यवस्थेची सर्वोच्च जबाबदारी असते आणि त्या व्यवस्थेचा केंद्रबिंदू म्हणजे शिक्षक. कारण शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसतो, तर तो व्यक्तिमत्त्व घडविणारा, विचारांना दिशा देणारा आणि समाजाच्या भवितव्याचा शिल्पकार असतो. विद्यार्थ्याच्या जीवनातील प्रत्येक शिक्षक महत्त्वाचा असतो. शालेय स्तरावर शिक्षक विद्यार्थ्याच्या ज्ञानाची पायाभरणी करतो, त्याच्या मनात जिज्ञासेची बीजे पेरतो आणि शिक्षणाची गोडी निर्माण करतो. तर उच्च शिक्षणाच्या स्तरावर प्राध्यापकाची भूमिका अधिक व्यापक आणि जबाबदारीची असते. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या टप्प्यावर विद्यार्थी केवळ ज्ञान संपादन करत नसतो, तर तो स्वतःची ओळख, ध्येय आणि जीवनदृष्टी घडवत असतो. अशा वेळी प्राध्यापक त्याच्या विचारविश्वाला आकार देतो, त्याच्या क्षमतांची जाणीव करून देतो आणि त्याच्या भविष्याचा शिल्पकार बनतो. उच्च शिक्षणाचा हा कालखंड विद्यार्थ्याच्या आयुष्यातील सर्वाधिक निर्णायक टप्पा मानला जातो. बालपणातील शिक्षणातून ज्ञानाचा पाया तयार झालेला असतो; परंतु याच टप्प्यावर विद्यार्थी ज्ञानार्जनातून कौशल्यार्जनाकडे आणि पुढे अर्थार्जनाकडे वाटचाल करू लागतो. रोजगार, व्यवसाय, संशोधन, उद्योजकता किंवा समाजसेवा यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये आपले स्थान निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेली दृष्टी, आत्मविश्वास, मूल्ये आणि निर्णयक्षमता यांचा विकास याच काळात होतो. त्यामुळे प्राध्यापकाचे कार्य केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित राहत नाही; तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारीही त्याच्यावर येऊन पडते. प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे नाते हे केवळ अध्यापनापुरते मर्यादित नसून ते मार्गदर्शक आणि साधक यांच्यातील नाते असते. प्राध्यापक विद्यार्थ्याच्या सुप्त गुणांना वाव देतो, त्याला चिकित्सक विचार करायला शिकवतो, नव्या संधींची जाणीव करून देतो आणि बदलत्या जगाशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करतो. त्यामुळे प्राध्यापक हा केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्याच्या भवितव्याचा शिल्पकार असतो.

"आचार्यात् पादमादत्ते पादं शिष्यः स्वमेधया।
पादं सब्रह्मचारिभ्यः पादं कालक्रमेण च ॥"

या संस्कृत सुभाषिताचा अर्थ असा आहे की, विद्यार्थी आपल्या ज्ञानाचा एक चतुर्थांश भाग आचार्याकडून, पुढील भाग उद्याच्या अंकात...




२. समशीतोष्ण वने (१५०० ते ३००० मीटर)
ही वने हिमालयातील सर्वात सुंदर आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाची वने आहेत.
प्रमुख वृक्ष : देवदार, चीड, फर, स्प्रूस, ओक,
■ उपयोग : देवदार मजबूत लाकूड पूल, घरे आणि मंदिरे बांधण्यासाठी
चीड : राळ (रेसिन) टर्पेंटाईन तेल ओक इंधन
पशुखाद्य औषधी उपयोग
देवदाराचे तेल त्वचारोगांवर उपयोगी ठरते.
चीडपासून मिळणारी राळ जंतुनाशक म्हणून वापरली जाते.
३. उप-अल्पाइन वने (३००० ते ४००० मीटर)
या भागात थंडी अधिक असते.
■ प्रमुख वृक्ष : भोजपत्र, जुनिपर, बुटकी फर,
उपयोग : धार्मिक विधी, सुगंधी पदार्थ, औषधनिर्मिती, औषधी उपयोग जुनिपरचा धूर वातावरण शुद्ध करण्यासाठी वापरला जातो.
भोजपत्राचे आयुर्वेदात विशेष महत्त्व आहे.
४. अल्पाइन कुरणे (४००० मीटरपेक्षा जास्त)
या प्रदेशात मोठे वृक्ष नसतात; परंतु मौल्यवान औषधी वनस्पती आढळतात.
प्रमुख औषधी वनस्पती : जटामांसी- मानसिक तणाव कमी करते. स्मरणशक्ती वाढवते.
कुटकी- यकृत विकारांवर उपयुक्त.
अतीस- ताप आणि पचनविकारांवर उपयोगी.
यार्सागुंबा -अत्यंत दुर्मिळ औषधी वनस्पती. शक्तिवर्धक म्हणून प्रसिद्ध.
ब्रह्मकमळ- उत्तराखंडचे राज्यपुष्प. धार्मिक व औषधी महत्त्व. : हिमालयातील औषधी वनस्पतींचे महत्त्व हिमालयाला "औषधी वनस्पतींचे भांडार" म्हटले जाते. आयुर्वेद, युनानी आणि आधुनिक औषधनिर्मितीमध्ये हिमालयातील वनस्पतींचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो.
काही महत्त्वाच्या वनस्पती आणि वनस्पती उपयोग
अश्वगंधा-रोगप्रतिकारशक्ती वाढवते.
जटामांसी- मानसिक आरोग्य, कुटकी- यकृत संरक्षण, अतीस
- ताप नियंत्रण, ब्राह्मी- स्मरणशक्ती वाढवते
भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये हिमालयीन वनांचे स्थान
हिमालयातील वने भारताच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहेत.
क्रमश:......

# धोंडी धोंडी पावशा..

**ज्योतिर्मय साहित्य**

दोन तीन दिवसांपूर्वी सहज शाळेतून पायी पायी घरी येताना, चाफेकळीचे बोटं दाबता दाबता बाळाने एक गीत गायला सुरवात केली.

ये आई ! बघ  ना ग! ये आई,
बघ ना गं, हे ऊन गं, कित्ती कित्ती दमवतयं.
बघ ना ग, या या घामाच्या थेंब थेंबातून ठिपकतयं.  ये आई !

आम्हा मैत्रिणींचा एकच हशा पिकला. थोडे दिवस बाळा, आता पावसाळा  चालू झाला की, नाही होणार त्रास. मग कधी पावसाळा चालू होईल. होईल थोडया दिवसांत. थोड्या दिवसांत म्हणजे केव्हा? अरे थोड्या म्हणजे थोड्या..! जाऊ दे,  बाबा आल्यावर मी बाबंनाच विचारतो. कधी कधी  वेळ मारून  नेण्याशिवाय  पर्यायच नसतो.   जोक सपाट पण एका क्षणाला वाटले, खरचं केव्हा येणारं पाऊस.नको झालाय हा उन्हाळा आता. सारा सार विचार करता लवकरच पाऊस यावा असा विचार डोक्यात आला.

बाबा घरी येत नाही तोवर याचं झालच सुरू. थोड्या दिवसांत म्हणजे केव्हा हो बाबा. बाबा ही मग थोड्या दिवसांत म्हणजे काही दिवसांत, काही दिवस का? मग ऊद्या का नाही? वगैरे वगैरे सात साडे सात वर्षाच्या मनाच्या त्या कल्पना, बाबा उद्या का नाही पाऊस पडत. अरे! बस झाले की आता, सारखे सारखे आपले पाऊस पाऊस लावलेय. पाऊस पाहिजे तर जा माग जा मग त्या धोंडीला. जरा मोठ्या आवाजात बोलले पण ते म्हणतात ना मनी वसे ते स्वप्नी दिसे तसे डोक्यात चाललेल्या विचारावरून सहज बोलून गेले. तोवर याचं

''आता हा धोंडी कोण?''

बाल मनच ते कधी कधी एखाद्या प्रश्नाचे उत्तर देणे किती अवघड होऊन जाते नं! ये आई, ''सांग ना हा धोंडी कोण? त्याला मागितल्यावर पाऊस येतो.''

धोंडी हे एक पात्र आहे. मला थोडी फार माहिती आहे ती मी तुला सांगते. बाळा... !!

आम्ही लहान असताना तुला माहिती आहे का ,जून महिन्यात जशी शाळा सुरू होते, तसाच जून महिना सुरू झाला की शेतीच्या कामांना ही सुरुवात व्हायची. पहिल्या  आठवडयात म्हणजे ७ जून   ला मृग नक्षत्र निघते. आणि मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर पाऊस सुरू होतो. असे मोठी माणसे आम्हाला सांगायची. आणि पाऊस सुरू ही व्हायचा. अर्थात कधी तो मागे पुढे व्हायचा किंवा आजही होतो. कधी चंद्रसवैरा व्हायचा. पूर्वीच्या लोकांचे काही तर्क किंवा आराखडे असायचे. पूर्वी प्रसारमाध्यमे खूप कमी असल्यामुळे असेल कदाचित म्हणजे रेडिओ, पत्र, दूरदर्शन अशी काही साधने होती. हे ही जास्त नव्हते. पाण्याचे घटिका



पात्र वाळूचे घटिका पात्र इत्यादी.

पूर्वीचे लोक काही पक्षांच्या येण्याने त्यांच्या आवाजावरून अनेक पक्षांचे आवाज ध्वनी वरून म्हणजे जसे पावशा पक्षी ओरडतो, त्याच्या ओरडण्याची ती एक विशिष्ठ धून ती म्हणजे पेरते व्हा त्याला स्थलांतरसारखे शास्त्रीय कारण असावे. पण तरी असा आवाज  म्हणजे पेरते व्हा  पेरते व्हा आला की शेतीच्या कामांना सुरुवात व्हायची. हे एक उदाहरण बर का!

शेतकर्यांचे जीवन पावसावर अवलंबून असते. आणि एखाद्या वर्षी पाऊस पडायला उशीर झाला की पाऊस पडावा म्हणून वरुण राजाला विनंती करण्यासाठी शेवटी प्रयत्न करणे हेच त्यांच्या हातात असायचे. आणि त्याच विचार धारेतून तयार झालेले एक पात्र म्हणजेच हा धोंडी.



©सौ. वैशाली महाडिक, सातारा ९७६७४३७९२३

तर हा धोंडी म्हणजे फार पूर्वी जुन्या काळी जून महिना उलटून खूप दिवस झाले तरी पाऊस पडला नाही तर एक धोंड्या नामक पात्र तयार करून म्हणजेच कुमार वयोगटातील एक मुलगा त्याच्या कमरेला लिंबाच्या झाडाच्या छोट्या छोट्या फांद्यांच्या साहाय्याने कमरेभोवती वस्त्रा प्रमाणे गुंडाळून डोक्यावर एक पाट आणि आजूबाजूला काही त्याच वयोगटातील मुले अशी ती संकल्पना.

सुरुवातीला एका ठिकाणी जमून एक धोंडा (दगड) घेऊन त्याची पूजा केली जाते. अर्थात प्रत्येक ठिकाणी अशीच पद्धती असे काही अपेक्षित नाही. वेगवेगळ्या पद्धती असू शकतात. याच्यात काही त्रुटी उणीवा असू शकतात. जी थोडी फार माहिती आहे त्याच्यावरून लिखाणाचा एक छोटासा प्रयत्न. तर त्याची पूजा करायची. काही मुलांनी छोटया ताटावरती चमचा वाजवत पुढे पुढे चालायचे . काही मुले धोंडी धोंडी पाणी दे रे, पावशा पावशा घुमू दे. थोडक्यात काय तर पावशा पक्षी रान माळतून घुमायला लागला की पाऊस येणार ही धारणा असावी. तसेच मोठमोठ्याने   धोंडी धोंडी पावशा  धोंडी धोंडी  पावशा

धोंडी धोंडी पाणी दे रे, रान माळ पिकू दे.

असे गीत गात गात घरोघरी गल्ली बोळातून जायचे, घरातील ही लोकं धोंडीच्या डोक्यावरील पाटावर पाणी ओतून पूजा करायचे.  आणि एक घरातील जी भाजी भाकर असेल ती नैवेद्य म्हणून देत. आणि पुन्हा एकदा धोंडी धोंडी पावशा करत पुढच्या घरी निघायचे. डोक्यावरच्या पाटाची कल्पकता बहुतेक वरून ओतले जाणारे पाणी बाजूंनी पडावे. जेणेकरून धोंडी होणाऱ्या मुलाचे पाण्यापासून संरक्षण व्हावे यासाठी डोक्यावरच्या पाटाची संकल्पना आली असावी. आणि लिंबाच्या पाला हा उष्णतेस उपयुक्त तसेच आरोग्यास उपयुक्त आहे. म्हणून कदाचित लिंबाच्या झाडाचा पाल्याचा वापर केला गेला असावा.

एक एक करत गावातून बऱ्यापैकी फिरून येऊन, एकत्र जमून ती भाजी भाकरी   काही असेल ते एकत्र जमवून ज्या ठिकाणी धोंड्याची पूजा केली असेल त्या ठिकाणी पुन्हा एकत्र जमून त्याच भाजी भाकरीचा नैवेद्य दाखवून वरुण राजाला पुन्हा एकदा आर्जव ,प्रार्थना करून भाजी भाकरी खाऊन हा कार्यक्रम आटोपत असावा. काही ठिकाणी  पाऊस पडला नाही तर  महादेव  कोंडला जातो. असे ऐकण्यात आले होते. म्हणजे प्रत्येकाची पद्धती वेगवेगळ्या असूचं  शकतात. म्हणजे मला याच्याबद्दल जास्त काही माहिती नाही. काही उणीवा असू शकतात.

माझ्या संकल्पनेतून तयार झालेले धोंडीचे गीत...

पाऊस येऊ दे रे धोंडी धोंडी
पीक पाण्याची झालीय कोंडी.
कोंडी आता ती सुटावी,
नभातली घागर फुटावी.
गाय न वासरू भेटावी,
हात तोंडाची गाठ पडावी.
पाऊस  येऊ दे रे ....
भेगळली भुई रे, कशी आम्ही सांधावी.
ओसाड माळाव नक्षी कशी गोंधावी.
मातीच्या गंधाची दरवळ वाऱ्यावर  दाटावी.
गुदमरल्या श्वासाची त्या कोंडी रे फुटावी.
पाऊस येऊ दे रे धोंडी...

# महाराष्ट्रातील सात मान्यवरांना 'पद्म' पुरस्कार प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**

नवी दिल्ली – देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील सात मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन , प्रधान मंत्री नरेंद्र मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांसह अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते.

पद्म पुरस्कार वितरणाच्या दुसऱ्या टप्प्यात देशभरातील ६५ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये २ पद्मविभूषण, ७ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे.


महाराष्ट्रातील मान्यवरांपैकी प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. १६ हून अधिक भाषांमध्ये २ हजारांपेक्षा अधिक गीते गाऊन त्यांनी भारतीय संगीत क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

**सहा मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार**

क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'हिटमॅन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहित शर्मा यांनी भारतीय क्रिकेटला अनेक संस्मरणीय विजय मिळवून दिले आहेत.

वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस यांना पद्मश्री प्रदान करण्यात आला. भारतातील नवजात शिशुवैद्यकशास्त्राच्या अग्रणी तज्ज्ञांपैकी एक असलेल्या डॉ. फर्नांडिस यांनी १९८९ मध्ये मुंबईतील सायन रुग्णालयात आशियातील पहिली मानवी दूध बँक सुरू केली. अकाली आणि दुर्बल नवजात बालकांचे प्राण वाचविण्यात त्यांच्या कार्याचा मोठा वाटा आहे.

वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे ८९ वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. बांबू आणि सुक्या भोपळ्यापासून तयार होणारे सुमारे १० फूट लांबीचे तारपा वाद्य वाजविण्याच्या



त्यांच्या कौशल्याला राष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले.

अभिनेते, पटकथा लेखक, निर्माते आणि दिग्दर्शक आर. माधवन यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'अलैपायुथे', 'रहना है तेरे दिल में', 'थ्री इडियट्स', 'तनू वेड्स मनू', 'विक्रम वेधा' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या अभिनयाला प्रेक्षकांनी विशेष पसंती दिली आहे. 'रॉकेट्री : द नंबी इफेक्ट' या चित्रपटाद्वारे त्यांनी दिग्दर्शन क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली.

ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. चित्रपट, दूरदर्शन आणि रंगभूमी या तिन्ही माध्यमांमध्ये चार दशकांहून अधिक काळ त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्यावतीने हा पुरस्कार त्यांचे बंधू अरविंद मामनिया यांनी स्वीकारला.

उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अशोक खाडे यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. माझगाव डॉकमध्ये नोकरी करत असताना अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून त्यांनी १९९२ मध्ये भावांसह 'दास ऑफशोअर' कंपनीची स्थापना केली. आज ही कंपनी देशातील अग्रगण्य अभियांत्रिकी कंपन्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते.


यंदाच्या पद्म पुरस्कारांसाठी एकूण १३१ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून त्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कारार्थींमध्ये १९ महिलांचा समावेश असून १६ मान्यवरांना मरणोत्तर सन्मान जाहीर करण्यात आला आहे

# फकिरा – समाजपरिवर्तनाचा दृढ विचार मांडणारी कादंबरी

**ज्योतिर्मय साहित्य**


पुण्याच्या उत्कर्ष प्रकाशनचे प्रमुख माझे ज्येष्ठ मित्र सुधाकर  वामन जोशी (सु.वा. जोशी) यांनी मला अण्णाभाऊ साठे यांची फकिरा कादंबरीची प्रथमावृत्ती जी मार्च १९५९ साली प्रकाशित झाली ती दिली. ही कादंबरी अण्णाभाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीस अर्पण केलेली आहे. फकिरा या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशक आहेत अभिनव प्रकाशनचे वामन विष्णु भट. ही कादंबरी ७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड-परळ, मुंबई-१२ येथून प्रकाशित करण्यात आली असून या कादंबरीचे मुद्रक हे द.सं. गांगल, अक्षर मुद्रणालय-४३८ अ, सदाशिव पेठ-पुणे २ हे आहेत. पहिल्या आवृत्तीची ही कादंबरी मला मिळाल्याचा प्रचंड आनंद झाला. त्याचे कारण म्हणजे शांता शेळके यांनी ही कादंबरी उशीरा वाचली आणि त्यांनी ही कादंबरी वाचल्यानंतर मी स्वतःला पुरोगामी समजते परंतु ही कादंबरी उशिरा वाचण्याचे कारण म्हणजे दलित साहित्यिकांचे लिखाण मी वाचण्याचा प्रयत्न केला नाही हेच होय असे प्रांजलपणे कबूल करीत स्वतःला दोष दिला व तशा प्रकारची कबुली लेखाव्दारे समाजापुढे ठेवली. हा शांताबाई शेळके यांनी लिहिलेला लेख माझ्या वाचनात आला होता. अण्णाभाऊ साठे यांची ही फकिरा कादंबरी वाचल्यानंतर त्यांचे सर्व साहित्य झपाटल्यासारखे शांताबाई शेळके यांनी वाचून काढले व अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर मुबलक लिखाण केले.

शांताबाई शेळके यांनी फकिरा ही कादंबरी वाचल्यानंतर या कादंबरीवर एक समीक्षा प्रसिद्ध केली आणि या समीक्षेत अनेक महत्वाचे मुद्दे मांडले. त्यांच्या समीक्षेत अनेक महत्वाचे मुद्दे आहेत. फकिरा ही समाजपरिवर्तनाचा दृढ विचार मांडणारी कादंबरी असून दलित साहित्याच्या पहिल्या टप्प्यातील क्रांतीकारी दस्ताऐवज आहे. फकिरा ही दलित साहित्यातील सर्वोत्कृष्ट कादंबरी शालेय व विद्यापीठ अभ्यासक्रमात समाविष्ट असल्याने नव्या पिढीसाठी मार्गदर्शक आहे. फकिरा ही कादंबरी संघर्ष आणि दलित आत्मभान यावर आधारित सर्वांगसुंदर साहित्यकृती आहे. फकिरा ही कादंबरी मराठी साहित्यातील एक महत्वाचे पान असून ही कादंबरी मास्टरपीस आहेच पण त्याचबरोबर समकालीन आहे. शांता शेळके यांच्या फकिरा कादंबरीच्या समीक्षेने अनेक साहित्यिकांनी फकिरा कादंबरी वाचली आणि



कादंबरीची समीक्षा केली. यामुळे मराठी साहित्य विश्वाचा विस्तार झाला. फकिरा ही कादंबरी केवळ एक कादंबरी नाही तर ती एक सामाजिक घोषणा आहे. अण्णाभाऊ साठे यांनी शब्दांतून शोषितांचा हुंकार मांडला आहे.

फकिरा या १९५९ साली प्रकाशित झालेल्या पहिल्या आवृत्तीच्या कादंबरीच्या पुढील कव्हरच्या मागच्या बाजूस अण्णाभाऊ साठे यांच्या वारणेच्या खोऱ्यात (कादंबरी), चित्रा (कादंबरी), नवे तमाशे (तमाशे), शाहीर (पोवाडे) खुळंवाडी (कथा), दे.भ. घोटाळे (तमाशा), इनामदार (नाटक) या प्रकाशित झालेल्या साहित्याचा उल्लेख असून आगामी म्हणून वैजयंता (कादंबरी) रानगंगा (कादंबरी) अशी माहिती आहे. फकिरा या कादंबरीची कैफियत अण्णाभाऊ साठे यांनी मांडली आहे. ते म्हणतात... आजपर्यंत जे मी लिहिलं त्यावर झालेल्या बऱ्यावाईट टीकांचा तूर्त विचार न करता फक्त लिहित रहायचं हें माझं धोरण आहे. उगीच मुजोरी करू नये, हेच बरं. फक्त फकिरा विषयी थोडे सांगावं म्हणून लिहीत आहे. ते असं, की ही कादंबरी केवळ माझ्या प्रतिभेनं निर्माण केली नाही. प्रतिभेला सत्याचं – जीवनाचं दर्शन नसेल तर प्रतिभा, अनुभूति वगैरे शब्द निरर्थक आहेत असा माझा अनुभव आहे. कारण सत्याला जीवनाचा आधार नसला की प्रतिभा अंधारातील आरशाप्रमाणे निरुपयोगी ठरते. मग कितीहि प्रयत्न करून त्यांत प्रतिबिंब दिसत नाहीं आणि कल्पकता निर्बल होते. अगदी पंखविरहित पाखंराप्रमाणे ती उडूच शकत नाही. मी तरी अशी भरारी मारण्यात भलताच जड आहे. जशी प्रतिभेला वास्तवाची गरज भासते तव्दतच कल्पनेलाही जीवनाचे पंख असणे आवश्यक असते. आणि अनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल तर आपण कां लिहितों याचा पत्ताच लागणं शक्य नाहीं. म्हणून मी लिहितांना सदैव सहानुभूतीनं लिहिण्याचा प्रयत्न करतों. कारण ज्यांच्याविषयी मी लिहितों ती माझी माणसं असतात. त्यांची मुर्वत ठेवूनच मला लिहिणं भाग पडतं.



शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१

हा फकिरा हि माझा होता. जे साकार नाही त्याला आकार देण्याचं सामर्थ्य माझ्या ठायीं नाही. जे पाहिलं, अनुभवलं, ऐकलं, तेच मी लिहिलं आहे. त्यातून हा फकिरा निर्माण झाला आहे. डोंगरात नि त्याच्या पायथ्याला विखुरलेलं फकिराच कर्तुत्व एकत्र करून हा इमला उभारला एवढंच. आणि त्याचंहि एक कारण आहे. तें असं कीं, जेव्हां फकिराची भयंकर घोडदौड सुरू होती, तेव्हां मी पाळण्यांत आराम करीत होतों. त्या रात्रीं भर मध्याह्नीला तो भरधांव धांवत आला, तेव्हां त्यानं इंग्रजी खजिना लुटला होता. दारांत येऊन त्यानं अप्पाला हांक मारली. अप्पा घरीं नव्हता, म्हणून आत्या (अक्का) दारीं आली आणि तिनंच त्याला माझ्या जन्माची वार्ता सांगितली. ती ऐकतांच त्यानं ओटींतून दोन ओंजळी सुरती रुपये अक्काच्या ओटींत ओतले आणि बाळबाळंतणीची काळजी घ्या असं म्हणून तो टांच मारून निघून गेला. त्यावेळीं त्याच्या घोड्याच्या टापा अक्कानं ऐकल्या. तो आत्मसमर्पणाची वाट कसा चालला हे मला फार उशीरां समजलं. ज्या तलवारीच्या धारेनं त्यानं बाबर-खानाला जागोजाग नडवला, आडवला ती तलवार मला पुष्कळ दिवसां-नंतर पहातां आली.

कितीतरी दीर्घकालानंतर आईनं सांगितलं, की मी पहिली घुटी इंग्रजी खजिन्यांतील लुटीच्या पैशांचीच खाल्ली होती. मग अक्कानं, अप्पानं, त्या गांवानं नि माळानं, खोऱ्यानं मला जें सांगितलं तें हृदयांत सांठवून मी गप्प बसलो होतों. त्यानं माझ्यावर उपकार केला होता. त्याच्या पैशांची मी घुटी गिळली होती. सुरती रुपयांच्या दोन ओंजळी माझ्यावर उधळून तो गेला होता. त्याला मी कसा विसरणार ? सरकारी खजिना लुटून केलेले उपकार कसे फेडावेत याचा मी विचार करीत होतों. अखेर ज्ञानेशाचीं, तुकयाची, तीन कोटी मराठी जनतेची जी मराठी भाषा, तिचं भांडार लुटून फकिरा वर उधळून त्या दोन ओंजळीची फेड करण्याचा प्रयत्न मर्मी केला आहे.

हेतु एवढाच, कीं जो उपेक्षित होता, अंधारांत होता, तो प्रकाशांत यावा. त्यानं महाराष्ट्र शारदेच्या मंदिरापुढं चिरंतन उभं रहावं.

उपेक्षितांचा उत्कर्ष व्हावा म्हणून या महाराष्ट्रांत अविरत कष्टांचे डोंगर उलथणारांची मोठी परंपरा आहे. त्यांत पहिलं नांव महात्मा फुले यांचं आहे. आणि कै. श्री. म. माटे यांनीं उपेक्षितांच्या अंतरंगांत प्रवेश करतांच त्यांच्यावर महार माटे म्हणून आघात करणारेहि या भूमींत निपजले आहेत. परंतु माटेंचं श्रेष्ठत्व कायम रहाणार आहे. त्यांचाच मागोवा मीं घेतला आहे. परंतु फकिरा जरी उपेक्षित होता, तरी तो मला परका नव्हता. तो माझा होता. त्याच्या कर्तृत्वाचा पसारा आंवरून मी ही कादंबरी लिहिली आहे. ती कशी आहे हें महाराष्ट्रानं पहावं. कारण बा महाराष्ट्रा, तूं थोर आहेस, विद्वान् आहेस, करता करविता आहेस – आणि मी कांहींच नाहीं. ता. १-३-५९ चिरागनगर, घाटकोपर, मुंबई ३९.

– अण्णा भाऊ साठे

ही अण्णाभाऊ साठे यांची प्रस्तावना वाचत असताना मला संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांचे डोंगराएव्हडे योगदान आठवले. आमच्या लोकमंगल शिक्षण संस्थेच्या पाचही शाळेत अण्णाभाऊ साठे यांचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर आम्ही ठेवत असतो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची (मराठी भाषिकांची) स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालन मुंबईमध्ये आहे. आपण कितीजण हे दालन बघावयास जातो हा संशोधनाचा विषय आहे. मराठी भाषा आधिक समृद्ध करण्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांचा मोठा वाटा आहे.

ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे पहिले मराठी साहित्य संमेलन लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था आणि केतकर कुल महासभा यांच्यावतीने लोकमंगल हायस्कूल नागेवाडी-कुशी  सातारा या ठिकाणी घेण्यात आले. ज्ञान कोशकार केतकर यांनी १९२६ साली २३ ग्रंथकोशाचे काम पूर्ण केले त्याला १०० वर्षे २०२६ या वर्षात पूर्ण होत आहेत.त्यानिमिताने १८ जून २०२६ रोजी सातारा येथे घेण्यात आलेल्या संमेलनात संमेलनाध्यक्ष प्राचार्य श्याम भुर्के म्हणाले... केतकर साहित्य संमेलन हे वैशिष्टपूर्ण आहे. केतकर ज्ञानकोश १९२६ साली पूर्ण झाला. केतकरांनी कमवा व शिका पद्धतीने आपले शिक्षण अमेरिकेत पूर्ण केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेतही हीच योजना अजुनही चालू आहे,त्या साताऱ्यात हे संमेलन होत आहे. गरीबांना मातृभाषेत शिक्षण मिळाले पाहिजे हा ज्ञानकोशकार केतकरांचा आग्रह होता. ध्येयाने मराठी भाषेत समृध्द शिक्षण देणाऱ्या लोकमंगल हायस्कूल नागेवाडी-कुशी या शाळेत हे संमेलन होत आहे हा देवदुर्लभ योग आहे. या शाळेत शिक्षण घेऊन बरेच विद्यार्थी आज अमेरिकेत नोकरी-व्यवसायात असून आपणाला या शाळेनेच घडविले हे सांगत लोकमंगल हायस्कूल नागेवाडी-कुशी शाळेला अमेरिकेतून या शाळेचे माजी विद्यार्थी आर्थिक मदतही करीत आहेत. जे सरकार मातृभाषेकडे दुर्लक्ष करते त्यांना समाज क्षमा करीत नाही. **(क्रमशः)**

**हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)** E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559